# प्रेसनोट

अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती
दिनांक : ०७.११.२०२५

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती घटक,अमरावती. |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता | आलोसे श्री.अभय भिमसेन चंदेल वय–५० वर्ष,पद–वनपाल ,रा.कर कांडली,परतवाडा ता.अचलपुर जि.अमरावती |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ | ०१/०८/२०२५ चे १३/०३ ते १३/२६ चा दरम्यान |
| ४ | मागणी केली लाच रक्कम | ११,०००/–रुपये |
| ५ | तडजोडीअंती लाच रक्कम | ६,०००/– रुपये |
| ६ | स्विकारलेली लाच रक्कम | संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही |

**थोडक्यात हकिकत** : यातील तक्रारदार यांनी दिनांक ३१/०७/२०२५ रोजी तक्रार दिली की, त्यांची मौजे म्हसोना ता. अचलपुर जि.अमरावती येथे त्यांची आठ एक्कर शेती असुन त्यांचे शेतात २५ वर्षाआधि अंदाजे १२५ सागवान झाडे लावली होती. त्यापैकी ५० झाडे कापण्यासाठी त्यांनी दिनांक २४/०२/२०२५ रोजी मा. वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा येथे त्यांचे मुलाचे नावाने अर्ज केला होता. त्यानंतर मा.वन परिक्षेत्र अधिकारी, प्रादेशिक परतवाडा यांनी जाहिरनामा करुन कायदेशिर कार्यवाही पुर्ण केली होती.सदरचे प्रकरणात प्रादेशिक परतवाडा येथील वनपाल आलोसे श्री.अभय भिमसेन चंदेल यांनी तक्रारदार यांना हॅमर करुन रहदारी पास देण्यासाठी ११,०००/–रु. लाचेची मागणी केली होती.

दि. ०१/०८/२०२५ रोजी आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान पंचासमक्ष आलोसे श्री.अभय भिमसेन चंदेल यांनी तडजोडीअंती ६,०००/– रु. लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे श्री.अभय भिमसेन चंदेल यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम घेण्याचे टाळाटाळ करीत लाच रक्कम स्विकारली नाही. वरुन त्यांच्या विरुध्द परतवाडा पोलीस स्टेशन ला गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र,श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र यांचे मार्गदर्शनाखाली,पर्यवेक्षण अधिकारी श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.अमरावती, सापळा अधिकारी पो.नि.निलीमा सातव, पोलीस अंमलदार उपेंद्र थोगत,वैभव जायले,आशिष जांभोळे,चालक श्री. गोवर्धन नाईक यांनी पार पाडली.

नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

संपर्क: १)मा.श्री.बापु बांगर, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र
मो.क्र.९०११३२३८२६

२)श्री.सचिन्द्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती परिक्षेत्र
मो.क्र.९७६४२१०८८५

३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती
मो.क्र.९८२३१११५५,७५१७५७१०६४

अँन्टी करप्शन ब्युरो, ललीत सेंटर, परांजपे कॉलनी, अमरावती,ऑफीस फोन न. ०७२१–२५५२३५५, मो.न.९४०४२९९६२६, टोल फ्रि नंबर–१०६४

( निलीमा सातव )
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय
सत्यमेव जयते
अँन्टी करप्शन ब्युरो, अमरावती